आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, ८ जून २०२१ । वर्ष : ३
आपले वृत्तपत्र, आपला आवाज
अंक : ३३ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## अखेर आयपीएलचा 'मुहूर्त' ठरला

मुंबई : बीसीसीआयकडून कोरोनामुळे स्थगित करण्यात आलेला आयपीएलच्या उर्वरित सामन्यांचे आयोजन संयुक्त अरब अमिरातीत करण्यात आलेले आहे. माहितीनुसार, येत्या १९ सप्टेंबरपासून आयपीएलचा हंगाम पुन्हा सुरू होणार असून १५ ऑक्टोबरला अंतिम सामना रंगणार आहे. यासंदर्भात बीसीसीआय आणि अमिराती क्रिकेट बोर्ड यांच्यामध्ये चर्चा झाली आहे. बीसीसीआयकडून दुबई आणि शारजा येथे आयपीएलचे यशस्वी आयोजन करण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. त्याचबरोबर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परदेशी खेळाडूंची उपलब्धता या संदर्भात देखील यावेळी चर्चा झाली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# ऊसतोड कामगारांच्या मुलांचे पालकत्व

## राज्यात २० वसतिगृहे; संत भगवानबाबा शासकीय योजना कार्यान्वित

प्रतिनिधी

मुंबई : स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करण्याचा निर्णय बुधवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार पहिल्या टप्प्यात मुलांसाठी आणि मुलींसाठी स्वतंत्र प्रत्येकी १० वसतिगृहे सुरू करण्यात येतील. नवीन वसतिगृहे बांधण्यास कालावधी लागणार असल्याने सुरुवातीला ही वसतिगृहे भाड्याच्या इमारतीत सुरू करण्यात येतील आणि ती या शैक्षणिक वर्षापासून सुरू होतील, अशी माहिती सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.



राज्यात २३२ साखर कारखाने असून यामधून ८ लाख ऊसतोड कामगार काम करतात. या कामगारांच्या स्थलांतराच्या वेळी मुलांचे शिक्षणाचे हाल होतात व शाळेतील गळतीचे प्रमाणही वाढते. त्यामुळे या कामगारांच्या मुलांसाठी वसतिगृह योजना सुरू करण्याची घोषणा मुंडे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात के ली होती. त्यानुसार स्वर्गीय गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येणार असून त्यासाठी १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. बीड, अहमदनगर, जालना, नांदेड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, औरंगाबाद, नाशिक आणि जळगाव अशा १० जिल्ह्यांमधील ४१ तालुक्यांच्या ठिकाणी ही वसतिगृहे सुरू करण्यात येणार आहेत. ऊसतोड कामगारांची जास्त संख्या असलेले ४१ तालुके निवडून त्या प्रत्येक तालुक्यात



१०० विद्यार्थी क्षमता असलेले मुला-मुलींसाठी मिळून दोन वसतिगृहे अशी एकूण ८२ वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत. या ठिकाणी निवास, भोजन आदी सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येतील. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात ऊसतोड कामगारांची जास्त संख्या असलेले १० तालुके निवडून त्यामध्ये मुला-मुलींसाठी २ असे एकूण २० वसतिगृहे उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यातील ही २० वसतिगृहे या शैक्षणिक वर्षातच सुरू करावीत. या वसतिगृहाच्या इमारतीचे निर्माण होईपर्यंत भाड्याच्या इमारतीमध्ये वसतिगृह सुरू करण्यात येणार असल्याचे मुंडे यांनी सांगितले.

## फास्टट्रॅकन्यूज

### मुख्यमंत्री उद्धव ठाकरे घेणार पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट

मुंबई : राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीतील काही नेते आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिल्लीत जाऊन भेट घेणार आहेत. या भेटीदरम्यान लसीकरण, तौक्ते चक्रीवादळामुळे झालेले नुकसान, मराठा आरक्षण यांच्यासह राज्यातील विविध प्रश्नांवर चर्चा करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. उद्धव ठाकरे आणि नरेंद्र मोदी यांच्या भेटीदरम्यान मराठा आरक्षणायासंदर्भात देखील चर्चा करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच घटनादुरुस्ती आणि मागासवर्ग आयोगाच्या अनुषंगानेही या भेटीत चर्चा होऊ शकते. उद्धव ठाकरे यांनी राज्यातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी पंतप्रधानांची भेट मिळावी म्हणून पंतप्रधान कार्यालयाला विनंती केली होती. या भेटीकडे राज्याचे लक्ष लागले आहे.




### महाराष्ट्रात म्युकरमायकोसिसचे सर्वाधिक रूग्ण आढळले

दिल्ली : कोरोना असतांना देशात म्युकरमायकोसिसचे नवीन संकट आले आहे. देशातील २८ राज्यांमध्ये म्युकरमायकोसिस (ब्लॅक फंगस)चे एकूण २८,२५२ रूग्ण आढळले आहेत. यापैकी ८६ टक्के म्हणजेच २,४३७ प्रकरणांमध्ये कोरोना संक्रमणाचा इतिहास आहे. तसेच १७,६०१ मधुमेह असलेले रूग्ण आहेत. महाराष्ट्रात म्युकरमायकोसिसचे सर्वाधिक ६,३३९ रूग्ण आहेत. त्यानंतर गुजरातमध्ये ५,४८६ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. सोमवारी कोरोना संदर्भात उच्चस्तरीय मंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यामध्ये या बैठकीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ.हर्षवर्धन होते.

### लॉकडाऊनमुळे नैराश्य; हॉटेल चालकाची आत्महत्या

माजलगाव : शहरातील जुन्या कोर्टरोड भागातील हॉटेल व्यावसायिकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी पहाटे घडली. लॉकडाऊनमध्ये आलेल्या नैराश्यातून त्यांनी हे पाऊल उचल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. सुरेश तुकाराम सुपेकर (वय ५३) असे आत्महत्या केलेल्या हॉटेल व्यावसायिकाचे नाव आहे. सुरेश सुपेकर हे मागील अनेक वर्षापासून येथील जुन्या कोर्टरोड परिसरात हॉटेल व्यवसाय करीत होते. मागील तीन महिन्यांपासून लॉकडाऊनमुळे व्यवसाय बंद पडलेला होता. सोमवार पासून सर्व व्यवसाय सुरू होणार म्हणून साफसफाई करण्यासाठी ते पहाटे पाच वाजता हॉटेलमध्ये आले; परंतु बराच वेळ होऊनही ते अंघोळीसाठी घरी न आल्याने त्यांचा मुलगा शुभम सुपेकर हा पाहण्यासाठी गेला. यावेळी हॉटेलचे शटर बंद असल्याचे त्याला दिसले. त्याने शटर उघडून पाहिले असता, त्यास वडिलांनी पंख्याला गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सुपेकर यांना ग्रामीण रूग्णालयात दाखल केले. यावेळी डॉ.कुलकर्णी यांनी त्यांना मृत घोषित केले.



# बीड जिल्हा अनलॉक

## जिल्हाधिकारी रविंद्र जगताप यांचे आदेश; चित्रपटगृह मात्र बंदच राहणार

प्रतिनिधी

बीड : राज्य सरकारच्या आदेशानुसार जिल्ह्यात अनलॉकची प्रक्रिया सोमवारपासून सुरू झाली आहे. जिल्हा तिसऱ्या गटात येत असल्याने आता सोमवारपासून सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत हॉटेल, सलूनसह सर्व दुकाने उघडता येणार आहेत. अत्यावश्यक सेवेतील दुकाने आठवड्याचे सर्व दिवस तर इतर दुकाने शनिवार, रविवार वगळता इतर ५ दिवस उघडता येणार आहेत. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी रविंद्र जगताप यांनी शनिवारी रात्री उशिरा जारी केले आहेत.

आदेशात म्हटल्याप्रमाणे, जिल्ह्यातून आंतरजिल्हा प्रवसासाठी ई -पासची देखील गरज पडणार नाही. ५ गटात वेगवेगळ्या टप्प्यावर वेगवेगळे निर्बंध हटविण्यात आले आहेत. बीड जिल्ह्याचा समावेश तिसऱ्या गटात आहे. याठिकाणी अत्यावशक आणि इतर सर्व व्यवहार आता सुरू आले आहेत. फक्त त्यासाठी वेळेचे मर्यादा घालून देण्यात आली आहे. हॉटेल ५० टक्के क्षमतेने आठवड्यातील ५ दिवस सुरू करण्यात आले आहेत. दुपारी ४ नंतर हॉटेलला पार्सल सेवा देता येईल. सलून देखील दुपारी ४ वाजेपर्यंत आणि ५० टक्के क्षमतेने सुरु ठेवता येतील. ज्या ठिकाणी साईटवर मजुरांच्या राहण्याची सोय आहे अशी बांधकामे देखील सुरु करता येतील. क्रीडांगण, मैदाने, पार्क सकाळी ९ वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत, तर चित्रपटगृहे आणि मॉल मात्र बंदच राहणार आहेत. सार्वजनिक आणि खाजगी वाहतूक पूर्ण क्षमतेने सुरु राहणार असून खाजगी वाहतुकीसाठी पासची आवश्यकता राहणार नाही.

## आमचा रोष अजित पवारांवर नव्हे : चंद्रकांत पाटील

प्रतिनिधी

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्यात जुगलबंदी पाहायला मिळत आहे. चंद्रकांत पाटील यांना झोपेत सरकार पडणार अशी स्वप्ने दिसत असल्याचे अजित पवार यांनी म्हटले होते. त्यावर, अजित पवारांनी जपून भाषा वापरावी, अशी सूचना पाटील यांनी केली होती. आता, अजित पवार आणि चंद्रकांत पाटील यांच्यातील वादावर स्वत: पाटील यांनीच स्पष्टीकरण दिले आहे. आमचा रागा अजित दादांवर नसून दगा देणाऱ्या शिवसेनेवर असल्याचे पाटील यांनी म्हटले आहे.



अजित पवार आणि माझा काही बांधाला बांध नाही. त्यांचे आणि माझे वैयक्तिक वाद नाही. पण, ते जेव्हा माझ्या पक्षाबद्दल बोलतात तेव्हा मी उत्तर देणार असेही ते म्हणाले.

## बीडच्या 'स्पेशल डे' पॅटर्नची राज्यभर अंमलबजावणी?

प्रतिनिधी

परळी : सामाजिक न्यायमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या सूचनेनुसार बीड जिल्हा आरोग्य प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व लसीकरण केंद्रांवर एक दिवस राखीव ठेवत दिव्यांग व्यक्तींसाठी विशेष लसीकरण मोहीम राबवली असून, या मोहिमेचा परळीतील लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर येथील लसीकरण केंद्रावर पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

दिव्यांग व्यक्तींना लसीकरण केंद्रावर ये-जा करणे, यासह अन्य अडचणींचा विचार करून सामाजिक न्याय विभागाने दिव्यांग व्यक्तींचे प्राधान्याने लसीकरण करावे याबाबत मार्गदर्शक सूचना जारी केला होत्या.

त्यानुसार एक दिवस फक्त दिव्यांग व्यक्तींच्या लसीकरणासाठी राखीव ठेऊन प्राधान्याने त्यांचे लसीकरण करण्याच्या या विशेष मोहिमेची बीड जिल्ह्यातून सुरुवात झाली आहे. ही मोहीम संपूर्ण राज्यात राबविण्याचा आपला मानस आहे, असे मत यावेळी पालकमंत्री मुंडे यांनी व्यक्त केले.



## 'पेट्रोल पोहचले शंभरपार; बंद करा लूटमार'





माजलगाव : केंद्र सरकारकडून पेट्रोल, डिझेलच्या वाढत्या दरवाढी निषेधार्थ पेट्रोल पंपावर काँग्रेसचे अनुसुचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे, काँग्रेसचे शहराध्यक्ष शेख रशिद यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निषेध व्यक्त नोंदविला.

# महाराष्ट्रात लवकरच 'स्पुतनिक' दाखल होणार

## आरोग्यमंत्री राजेश टोपे यांची माहिती; लस वितरकांशी झाली चर्चा

प्रतिनिधी

मुंबई : केंद्र सरकारकडून पुरेसा लससाठा उपलब्ध झाला नसल्याने राज्य सरकारच्या १८ वर्षावरील नागरिकांच्या लसीकरणाच्या महत्वाकांक्षी मोहिमेला खिळ बसली आहे. यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न राज्य सरकार करत असून रशियाच्या स्पुतनिक या लशीद्वारे मोठी आशा निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने स्पुतनिक लशीच्या वितरकांशी चर्चा देखील केली आहे. त्यानुसार आता येत्या जुलै ते ऑगस्ट या महिन्यांमध्ये स्पुतनिक लशींचा मोठा साठा राज्याला उपलब्ध होणार आहे. ही माहिती राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली आहे.



राज्यांमधील लशींच्या उपलब्धतेचा प्रश्न मिटावा यासाठी केंद्र सरकारने हस्तक्षेप करून लस आयातीचे एक स्पष्ट धोरण ठरवणे आवश्यक असल्याचे मत आरोग्यमंत्री टोपे यांनी व्यक्त केले आहे. तसे झाल्यास




हा प्रश्न जलदगतीने सुटण्यास मदत होणार आहे. कोरोना विरुद्धची लढाई लढत असताना लस घेतलेल्या नागरिकांनीही काळजी घेणे आवश्यक असल्याचे टोपे म्हणाले. ज्या नागरिकांनी दोन लशी घेतल्या असतील, अशांनीही सर्व नियम पाळणे आवश्यक आहे. दोन लशींचे डोस घेतलेल्या नागरिकांनी देखील मास्क घालणे, सोशल डिस्टन्सिंग पाळणे हे नियम पाळणे अत्यंत आवश्यक असल्याचे टोपे म्हणाले. सध्या तरी तोंडावरचा मास्क हटणार नाही, असेही टोपे म्हणाले. जेव्हा लशींचे दोन डोस घेतले जातात तेव्हा शरीरात मोठ्या प्रमाणात अँटिबॉडी तयार होत असतात. शरीरात मोठ्या प्रमाणात अँटीबॉडी तयार झाल्या असतील तरी त्याचा कोणताही दुष्परिणाम होत नाही. मात्र लशींचे डोस घेतलेल्या व्यक्तींकडून इतरांना संसर्ग होत नसला तरी देखील मास्क घालणे आणि सोशल डिस्टन्सिंग पाळणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

# खाद्यतेलाचे वाढते बजेट

**गेल्या वर्षभरापासून खाद्य तेलाच्या किंमती वाढतायत. मे महिन्यात तर या किंमतींनी नवा उच्चांक गाठला. मागच्या वर्षी १०० रुपये लिटरला विकलं जाणारं तेल यावर्षी १८०-२०० रुपयाला विकलं जातंय. पेट्रोल दरवाढ झाल्यावर आराडाओरडा करणारे आपण रोजच्या जेवणातल्या तेलाचे दर वाढल्यावर गप्पं का बसलोय? पेट्रोलसारखंच तेलाच्याही आयात निर्यातीबद्दल आपण का बोलत नाही?**

पेट्रोलचे दर वाढले की आपण सामान्य माणसं अगदी कल्लोळ करून टाकतो. सोशल मीडिया म्हणू नका, पेपर, न्यूज चॅनेल म्हणू नका सगळीकडे फक्त आणि फक्त पेट्रोलची गरज, त्याच्या आयात निर्यातीचं गणित मांडताना आणि ते समजून घेताना आपली दमछाक होते. पण पेट्रोलपेक्षा दीड पट जास्त भाव आता आपल्याला खाद्यतेलासाठी मोजावे लागतायत, याकडे आपण फारसं लक्ष दिलेलं नाही. भारतात तेलाशिवाय जेवण तयार होऊच शकत नाही. शेंगदाणा, सोयाबीन, सुर्यफूल, मोहरी, तीळ अशी अनेक प्रकारची तेलं भारताच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या घरात वापरली जातात. गेल्या सहा महिन्यांपासून भारतातल्या घराघरात वापरल्या जाणाऱ्या या सगळ्या तेलांमधे सातत्याने वाढ होतेय. पेट्रोलपेक्षा दीड पट जास्त भाव आपण रोजच्या जेवणात वापरल्या जाणाऱ्या तेलासाठी देतोय. मेच्या अखेरपासून तर या खाद्यतेलांच्या किंमतीनं मोठा ज्वालामुखीच फोडलाय. गेल्या ११ वर्षातली सगळ्यात जास्त वाढ मेच्या शेवटी झालीय. त्यामुळे मागच्या लॉकडाऊनमधे १००-१२० रुपये लीटरपर्यंत मिळणारं तेल आता १८०-२०० च्या खाली मिळतच नाही. या पेट्रोल डिझेल दरवाढीला सरकार घेत असणारा अतिरिक्त कर जबाबदार आहे तसं खाद्यतेलाच्या दरवाढीसाठी काय जबाबदार असतं? या तेलाच्या किंमती कशा ठरतात? आणि कशा कमी करता येतात हे समजून घ्यायलाच हवं.

किती वाढल्या किंमती?

कन्झुमर अफेअर्सच्या वेबसाईटनुसार जून २०२० पासून ते जानेवारी २०२१ पर्यत म्हणजे पाच ते सहा महिन्यात खाद्यतेलाचे दर ४० ते ५० टक्के वाढले. म्हणजे जून २०२० ला जे तेल १०० रुपये लीटर होतं ते जानेवारीत १४०-१५० रुपये लीटर झालं. डिसेंबर जानेवारी या जवळपास काही दिवसातच एकाचवेळी १५ टक्के वाढ झाली. सॉल्व्हेंट एक्सट्रॅक्शन असोसिएशन ऑफ इंडिया ही भारतातली खाद्यतेलाचं उत्पादन करणाऱ्या उद्योजकांची संस्था आहे. या संस्थेचे प्रमुख अतुल चतुर्वेदी यांनी जानेवारी महिन्यात फायनॅन्शिअल एक्सप्रेसला दिलेल्या एका मुलाखतीत म्हटलं होतं की खाद्यतेलांच्या या वाढलेल्या किंमती मार्च एप्रिलपर्यत राहतील.



त्यानंतर त्या कमी होतील. पण किंमतींचा आलेख चढताच राहिला. सगळ्यात महत्त्वाच्या तीन तेलांचा विचार करायला हवा. सुर्यफूल, सोयाबीन आणि पाम तेल ही तीन तेलं भारतात खूप जास्त वापरली जातात. पाम तेल हॉटेलमधे वापरलं जातं. शिवाय, लिपस्टिक, कोलगेट, चॉकलेट, कॅडबऱ्या, पॅकेट बंद अन्न या सगळ्यात पाम तेलच असतं. इतर तेलांच्या तुलनेत हे पाम तेल स्वस्त असतं. पण त्याच्या किंमती वाढल्या तर त्याचा परिणाम इतर वस्तूंच्या किंमतीवरही होतो.

तेलाच्या उत्पादनाची क्षमता

डाऊन टू अर्थ या वेबसाईटवरच्या एका लेखात प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार प्रत्येक भारतीय वर्षाला जवळपास २० लीटर तेल वापरतो. म्हणजे सगळ्या भारतीयांची वर्षाची तेलाची गरज साधारणपणे २ कोटी ६० लाख टन एवढी असते. भारतातल्या अडीच कोटी हेक्टर जमिनीवर सोयाबिनसारख्या तेलबियांची लागवड होते. त्यातून फक्त २५ ते ३० टक्के खाद्यतेलाची गरज पूर्ण होते. उरलेलं अर्थातच आयात करावं लागतं. २०१९ मधे भारतानं दीड कोटी खाद्यतेल आयात केलं होतं. त्याचा सगळा खर्च होता साधारण ७ हजार ३०० कोटी रुपये. भारत जितकी शेती उत्पादनं आयात करतो त्यातला ४० टक्के भाग तर ही खाद्यतेलंच असतात. आयातीत पाम तेलाचा सिंहाचा वाटा असतो. जगात सगळ्यात जास्त पाम तेल मलेशिया आणि इंडोनेशियामधे बनवलं जातं. अर्जेंटिना आणि ब्राझीलकडून

**आज-काल**

**रेणुका कल्पना**

सोयाबीन तेल तर युक्रेनकडून सुर्यफूल तेल आयात होतं.

किंमत वाढण्याची कारणं

खाद्यतेलाचा जास्त भाग आयात करावा लागत असल्यामुळे आंतरराष्ट्रीय घडामोडींवरही त्याच्या किंमती ठरतात. मलेशियातल्या पाम तेलाच्या प्लांटमधे मजुरांची कमतरता आली, युक्रेनमधे, अर्जेंटिनामधे दुष्काळामुळे सूर्यफुलाचं किंवा सोयाबीनचं उत्पादनच कमी झालं अशा अनेक गोष्टींमुळे भारतातल्या खाद्यतेलाच्या किंमती गेल्या काही दिवसात वाढल्यात.

त्यातही सध्या चीन, अमेरिका, रशिया अशा मोठ्या देशांमधे कोरोनाची परिस्थिती नियंत्रणात आलीय. अमेरिकनं तर स्वतःला मास्कमुक्तही घोषित केलंय. तिथली हॉटेल, कॅफे सगळं नेहमीसारखं सुरू होतंय. त्यामुळे तिथली खाद्यतेलाची मागणी नेहमीपेक्षा जास्त आहे. चीननेही तेलाची भरपूर मागणी केलीय. मागणी वाढली आणि पुरवठा कमी असेल तर उत्पादनांचे दर वाढतात हा तर अर्थव्यवस्थेचा मुरलेला नियम आहे.

जहाजं अडकली बंदरात

ही टंचाई सुरू असतानाच भारतातल्या बंदरात तेलाची जहाजं अडल्यानं आणखी घोळ झालाय. तेलाचा व्यापार हा समुद्रमार्गातून जास्त होतो. गुजरात आणि केरळमधल्या बंदरांवर तेलाची मोठमोठी जहाजं उतरत असतात. खाद्य पदार्थ घेऊन येणारं जहाज बंदरावर उतरलं की अन्न आणि सुरक्षा प्राधिकरणाकडून तपासला जातो आणि मगच त्याला बंदरावर उतरवलं जातं. गुजरातमधल्या कांडा आणि मुंद्रा बंदरात प्राधिकरणाकडून असं एक जहाज थांबवून ठेवण्यात आलंय. भारतात कोरोनाची दुसरी लाट आल्यामुळे हा माल तपासणाऱ्या कर्मचाऱ्यांची कमतरता जाणवतेय. त्यामुळे गेल्या २ महिन्यांपासून हा माल बंदरावरच अडकून पडलाय. यात काही लाख टन खाद्यतेल आहे. एकदा हा माल मोकळा झाला की तेलाच्या किंमती पुन्हा खाली यायला मदत होईल.

कर कमी करण्याची गरज

शिवाय, आंतरराष्ट्रीय बाजारात काहीही उलाढाली झाल्या तरी भारतात या किंमती स्थिर ठेवायच्या असतील तर केंद्र सरकारला आयात कर कमी करावा लागतो.

पण पेट्रोल डिझेलप्रमाणेच यावरचाही कर कमी करायला सरकार तयार होत नाही. जानेवारीमधे तेलाच्या किंमती वाढतील असं सांगणाऱ्या अतुल चतुर्वेदी यांनी तेव्हाच सरकारला कर कमी करण्याचा सल्ला दिला होता. तेल ही जीवनावश्यक वस्तू असताना त्यावर कर लावणं चुकीचं असल्याची भूमिका तेल कंपन्या नेहमीच घेत असतात. खरंतर, तेल बियांचं उत्पादन वाढवण्याची क्षमता भारतात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तर फायदा होईलच पण आयात कमी होऊन तेलाचे भावही सामान्य माणसांना परवडणारे राहतील. केंद्र सरकारच्या टेक्नॉलॉजी मिशन ऑन ऑईलसीड यासारख्या योजना मदतीला आहेतच. खाद्यतेलावर कायमचा तोडगा काढायचा असेल तर भारताला आत्मनिर्भर व्हावंच लागेल.

## संपादकीय

# वृक्षवल्ली आम्हां सोयरे

पर्यावरणाचा समतोल राखताना केवळ एक दिवसच नाही, तर पर्यावरणाचा जागर वर्षभर व्यापक झाला पाहिजे. ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो. पर्यावरण संवर्धनासाठी जागरूकता निर्माण करून पोषक वातावरण निर्माण करणे, हाच पर्यावरण दिन साजरा करण्यामागचा प्रमुख हेतू आहे. अनेक ठिकाणी व्याख्याने, स्पर्धा, आयोजित करून पर्यावरणाचा ऱ्हास कसा रोखता येईल याविषयक माहिती, संदेश दिला जातो. पण एक प्रश्न सतत मनात येतोच की, असे दिवस साजरे करून पर्यावरणाचे संवर्धन होणार आहे का? पर्यावरणाचा ऱ्हास का होतो? याला आपण किती जबाबदार आहोत? निसर्गातील बदल, अनियमितपणा किती कारणीभूत आहे? याचाही विचार करावा लागेलच. खरं म्हणजे, पर्यावरण आणि प्रदूषण याचा खूप जवळचा संबंध. अनेकविध प्रकारच्या प्रदूषणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असतो. प्लास्टिकचा कचरा, जुनी इलेक्ट्रिक उपकरणे फेकून दिली जातात, हे सर्व नष्ट होत नाहीत. प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी येऊनही सर्रास वापर सुरू आहे. माणसांबरोबर जनावरांनाही ते घातक आहे. हे मानवनिर्मित प्रदूषण आहे. अनेक कारखाने असे आहेत, ज्यातून विविध वायू, धूर बाहेर पडतो. यामुळे सभोवतालचे वातावरण दूषित होते. वाहनांची संख्या खूप वाढली आहे. त्यातही जुनी वाहने, वेळीच सर्व्हिसिंग न होणारी वाहने खूपच धूर सोडतात, त्यामुळेही मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. आपल्याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे. वाहन तपासणी होते, पोल्युशन प्रमाणपत्र बंधनकारक आहे. पण कुठेतरी या प्रक्रियेत त्रुटी आहेत, त्या दूर करण्याची गरज आहे, तर वातावरणातील बदलाचा पर्यावरणावर होणारा परिणाम म्हणजे निसर्गनिर्मित प्रदूषण. याचे उदाहरण म्हणजे निसर्ग वादळ पावसाने हजारो वृक्ष उन्मळून पडले. वृक्ष नष्ट झाल्याने पर्यावरणाचा समतोल ढळतो. दरवर्षी पर्यावरण दिवस साजरा करताना एक घोषवाक्य असते, जसे ५ जून २०११ साली भारताकडे यजमानपद असताना वन निसर्ग आपल्या सेवेसी' असे घोषवाक्य होते. ५ जून २०१८मध्ये भारताची दुसऱ्यांदा यजमानपदी निवड झाली, तेव्हा प्लास्टिक प्रदूषणाशी संघर्ष' असे घोषवाक्य होते. यावर्षी जागतिक पर्यावरण दिवस कोलंबियात साजरा झाला, जैवविविधता' हे घोषवाक्य आहे. पर्यावरण समतोल राखण्यासाठी जैवविविधता संपन्न असायला हवी. वेळप्रसंगी दंडात्मक कारवाई करायलाच हवी. ती कोणी करावी, हे नक्की करायला हवे. पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज आहे, याचे भान सगळ्यांनीच ठेवायला पाहिजे. ही नक्कीच सामूहिक जबाबदारी आहे. जगद्गुरू संत तुकाराम यांनीही पर्यावरणावर 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे' अशा शब्दात पर्यावरणाचे महत्व विशद केले आहे, ते किती यथार्थ आहे याची प्रत्येकाने जाणिव ठेवावी.



# 'शिवराज्याभिषेक' एक सुवर्णक्षण

**विशेष**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि अवघ्या महाराष्ट्राचे दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा दरवर्षी ६ जूनला किल्ले रायगडावर मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी रायगड किल्ला होता. याच ठिकाणी ६ जून १६७४ या दिवशी महाराजांचा राज्याभिषेक झाला. त्यामुळे हा दिवस भारतीय इतिहासातील सुवर्णक्षण म्हणून ओळखला जातो. या पार्श्वभूमीवरच महाराजांचा राज्याभिषेक सोहळा कसा झाला होता? महाराजांनी रायगडालाच का राजधानीचा दर्जा दिला होता? याविषयी माहिती जाणून घेऊयात. असा होता शिवराज्या भिषेक सोहळा :प्रत्यक्षात शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन आपण ऐकले तर तो एक दैदिप्यमान सोहळा होता. यात राजांचा अभिषेक करण्यात आला आणि त्यानंतर त्यांच्या डोक्यावर छत्र धरण्यात आले. हे दोन मुख्य विधी पार पडल्यानंतर महाराज छत्रपती झाले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी पांढरी शुभ्र वस्त्र परिधान केले होते. गळ्यात फुलांच्या माळा घातलेल्या होत्या. त्यानंतर महाराजांनी हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली. गागाभट्ट आणि इतर ब्राह्मणांनी मंत्रोच्चारण करत शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा केला. त्यानंतर ३२ मण सोन्याने सजवलेल्या भव्य सिंहासनावर महाराज आरुढ झाले. महाराजांनी रायगडालाच का दिला राजधानीचा दर्जा? शिवाजी महाराजांनी ६ एप्रिल १६५६ रोजी रायगडास वेढा घातला होता. पुढे एका महिन्यानंतर हा किल्ला महाराजांच्या ताब्यात आला. तेथे असताना, कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद खजिना घेऊन विजापूरकडे निघाल्याची बातमी महाराजांना समजली. त्यांनी तो खजिना लुटून रायगडावर आणला. त्या खजिन्याचा उपयोग गडाच्या बांधकामासाठी केला. रायगडाचा माथा राजधानी बनवण्यास सोयीचा आहे. शत्रूला अवघड वाटणाऱ्या प्रदेशातले ते अधिक अवघड ठिकाण आहे. सागरी दळण वळणासही हे ठिकाण जवळ आहे म्हणून राजधानीसाठी या गडाची निवड केली.

# वैभवशाली अहिल्याराज

**हिमालयाच्या केदारनाथपासून दक्षिणेच्या रामेश्वरपर्यंत आणि पूर्वीच्या जगनाथपुरीपासून पश्चिमेच्या द्वारकेपर्यंत चालू होते त्यानी प्रचंड प्रमाणावर माणसे जोडली होती त्यांच्या एकूण कार्याची प्रेरणा हीच मुली लोककल्याण ही होती लोकांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी अहिल्यादेवींनी संपूर्ण जीवन वेचले.**



दुःखयाचे आघात सोसत मोठ्या धैर्याने पुढे गेलेले व्यक्तिगत जीवन स्वकीयाकडून सन्मान घेत घेत त्यांच्याशी सामानही देत देत पुढे गेलेले राजकीय जीवन होय, संपूर्ण भारताला आदर्श वाटावे असे सुंदर रचनात्मक सेवाभावी काम करून अहिल्यादेवींनी भारताच्या इतिहासात अलौकिक स्थान निर्माण केले, अहिल्यादेवींनी बांधलेली मंदिरेघाटावरून त्यांच्या धर्मप्रवतेची नि समृद्ध मनाची त्याचप्रमाणे लोकहीतकारक वास्तूच्या निर्मितीची जाण होऊ लागली, आजही हे घाट, ही मंदिरे अहिल्याबईच्या भक्तीप्रवनतेची साक्ष देतात हे मन भक्तीप्रवन व श्रद्धाळू असले तरी परिस्थितीशरण, अगतिक वा असहाय नाही ते मुळातच न डगमगणारे नि आत्मविश्वासाने बक्या प्रसंगांना धीराने सामोरे जाणारे आहे हे त्यांचे पती खंडेराव गेल्यानंतरही त्या जशा सावरल्या व त्यांनी ज्या कौशल्यानी राज्यकारभार

केला ते पाहाऊन मन विस्मित होते,विविध जातीधर्माचे लोक त्यांनी राज्यकारभारात सहभागी करून घेतले विद्वानांना आश्रय देऊन त्यांचा प्रतिपाळ करून तसेच सातपुड्याच्या पर्वतराजीत रहाणाऱ्या व समाजाने चोर लुटारू ठरवलेल्या भिल्लाना उपजीविकेचे साधन देऊन त्यांच्या मार्फत चोरीमाऱ्याचा बंदोबस्त करून घेतला समाजातील सर्व स्तरातील लोकांचे हितरक्षण केले. अहिल्याबईची कारकीर्द नायनिष्ठेमुळे जनमानसात अविस्मरणीय ठरली. त्यांनी दिलेल्या न्यायानिवाड्याची उदाहरणे ऐतिहासिक दस्तऐवजमधून उपलब्ध होतात. त्यांच्या न्यायीपणावर लोकांची एक श्रद्धा होती की, अहिल्याबाईंनी दिलेला न्याय अमान्य करणे म्हणजे पाप करणे असे लोक समजत होते. राघोबादादाने इंग्रजांशी सलोखा करू नये म्हणून अहिल्याबाईंनी शक्य तेवढे प्रयत्न केले.इंग्रजांनी वसई घेण्यासाठी हालचाली सुरू केल्याचे समजताच फ्रेंचाची मदत घेऊन पेशवे व आंग्रे यांनी कसा बेत करावा याबद्दलचे खूप मुसद्देगिरीचे राजकारण त्यांनी चालविले. पण नाना फडनविसाने अहिल्याबईच्या सुचनाकडे दुर्लक्ष केल्यामुळे मराठ्यांना वसई गमवावी लागली इंग्रजांशी टक्कर देता यावी म्हणून पाश्चात्यपद्धतीचे सैन्य उभे करण्यासाठी अहिल्याबाईंनी आपल्या लष्करात फ्रेंच, अमेरिकन अधिकारी नेऊन त्यांच्याकडून कवायती, फलटणी तयार करून घेतल्या होत्या.

देवी अहिल्याबाई,<br>
झालीस जगत्री तू धन्य<br>
न न्याय धर्मगिरता अन्या<br>
काळिमाजी एकली कन्या

देवी अहिल्याबाई आपण या जगात खरोखरच धन्य या कलियुगात आपल्यासारखी न्यायप्रिय व धर्मत्मा अन्य कोणी नाही. हे कवी मोरोपंतांचे उदगार महत्वाचे वाटतात.

त्यांच्या राज्यात न्यायदानाचे कार्य विनाविलंब होत असे.त्यांचा न्यायापद्धतीची एक खासियत होती.अहिल्यादेवीचया न्यानिवाड्यावर वादी प्रतिवादी दोनी पक्ष समाधानी होत असत. पीडितांच्या न्याय अन गुन्हेगाराला शासन मिळत असे.गुन्हेगार माणूस आहे, त्याला सुधारण्याची संधी दिली जात असे. गुन्हेगाराची निर्दोष बायकामूल उघड्यावर पडू नयेत म्हणून त्यांना उपजीविकेचे साधन दिले जाई. अहिल्याबईनी चोरालाच शिपायाचे काम करायला लावून त्यांच्यावर विश्वास दाखविला. त्यांची मानसिकता बदलून सन्मानाने जगण्याची संधी दिली. असा समतामुलक मानवतावादी

**निमित्त**

**डॉ.ज्ञानेश्वर गवते**

न्यानिवाडयाचा आदर्श जोपादला. अहिल्याबाईचे पती सुभेदार श्री खंडेराव होळकरांना कुंभेरीच्या लढाईत वीरमरण आले.सनातन धर्माप्रमाणे त्या पुरुषांच्या विधवांना त्यांच्यासोबत सती जावे लागे. खंडेरावबरोबर अहिल्याबईना सती जाण्यापासून पुरोगामी सासुसासरे गौतमाबाई व मल्हाररावानी रोखले व अहिल्याबईनी सतीप्रथेविरुद्ध जाण्याचे धाडस दाखविले. खंडेरावाच्या इतर बायका सती गेल्या

. त्या बायकांमध्ये काही मुस्लिम बायकाही होत्या सर श्रद्धविधीच्या वेळी मुस्लिम बायकांची नावे घेऊन पाणी सोडण्यास भटजींनी नकार दिला होता. तेंव्हा अहिल्याबाईनी कडक शब्दात त्यांची कानउघाडणी केली. त्या महनाल्या,जाती काय धर्मनीच बांधावातं का? चराचरात ईश्वर पाहायला धर्म सांगतो.ज्या स्वामीमागे जळून खाक झाल्या, त्यांच्या नावे दोन पळ्या पाणी सोडणे जमत नसेल तर बंद करा तो श्राद्धविधीस अहिल्यादेवी धार्मिक जरूर होत्या पण इतर धर्माचा द्वेष करीत नव्हत्या. त्या अपार धर्मसहिष्णू होत्या.आपल्या राज्यातील मंदिरे, पीर, मशिदी यांची व्यवस्था त्यांनी लावली अहिल्यादेवींनी होळकरांच्या राज्यातच नव्हे तर हिमालयापासून रामेश्वरपर्यत संपूर्ण भारत खंडात हे कार्य केले.

आक्रमकांनी देवस्थानाचा व तिर्थक्षेत्राचा जो प्रचंड विधवन्स केला होता. त्यांच्या पुनरुजीवणाची देशव्यापी मोहीम अहिल्यादेवींनी यशस्वी केली याची साक्ष त्यांनी जिर्णोध्दार केलेली, नव्याने बांधलेली शेकडो मंदिरे, नद्यावरील घाट,धर्मशाळा, विहिरी, कुंड, अन्नछत्रे आजही देत आहेत. मुस्लिमांच्या पीर मशिदीनाही त्यांनी इनामे, देणग्या देऊन त्यांचेही संवर्धन केले. राज्ये, साम्राज्य लयास गेली, पण अहिल्याबाईचे साम्राज्य लयास गेले नाही.

मातोश्रीचे जीवन म्हणजे संकटाची मालिका, आणि मृत्यूचे तांडव. पती सासरे यांचा मृत्यू व सासूचे सहगमन, पुत्राचे निधन, भाऊ, नातू, जावई यशवंतराव फणसे यांचे निधन मुलगी मुक्ताचे सहगमन आणि अपत्यस्वकीयांचे मृत्यू व त्याबरोबर स्त्रियांचे सहगमन त्यांना उघड्या डोळ्यांनी पाहावे लागले. दुःखाचा लवलेश प्रजाननांना होऊ न देता त्यांच्या सुखातच आपले सुख मानून प्रजेला आदर्श राज्य देतात. वास्तुशिल्पे, बांधकामे यामुळे कारागिरांची कला जोपासून संस्कृतीचा वारसा जपला. शेतकऱ्यांचा जाचक कर रद्द केला. वृक्ष लागवड केली शेतकऱ्यांना गाई देऊन गोपालन केले. हिंदू संस्कृतीची कला, वास्तुकला, स्थापत्यकला, वस्त्रोउद्योग, कला जपण्याचे असामान्य कार्य स्वतःच्या खासगी दौलतीतून केले.अहिल्यादेवीच्या आदर्श राज्यांची ख्यातकीर्त ऐकून अनेक विदवान लोक माहेश्वरीत येत असत. सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही असे प्रजेला निक्षूंन सांगितले. अंधश्रद्धा लोकजीवनातील दूर केल्या. भक्षकांनाच रक्षक बनवून प्रवाशाकडून भिल्ल लोकांना 'भिल्लकवडी'कर देण्याची परवानगी दिली. फिर्यादी आणि अपराधी यांना आपणास न्याय मिळाल्याचे समाधान वाटे सर्वधर्मसमभाव होता. मंदिराबरोबर मशिदी बांधल्या.टिपू सुलतान व निजाम येथील त्यांची प्रजा महेश्वर नगरीत येण्यास उत्सुक होती.अगाध संपत्तीची मालकीण असूनही त्या टॉप्सवीचे जीवन जगल्या. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराला चांदीची भांडी दिल्यावर त्यावर खालील दोन ओळी त्यांच्या साधेपणाची साक्ष देतात.

सर्व सुखी विठ्ठल पायी,<br>
जाणे होळकर अहिल्याबाई

अहिल्यादेवींनी युद्धनीतीची इंग्रजांनाही भीती वाटत असे। दिवाण चंद्रचूड व राघोबादादा यांच्या मदतीने दौलत बुडविण्याचा मनसुबा आखतात पण अहिल्यादेवीच्या युद्धनीतीला घाबरून राघोबादादा देवीच्या भेटीस जातात.आहिल्यादेवीने राघोबास राजनीती व युद्धकौशल्याचा वापर करून हरविले.बारा ज्योतिर्लिंगाचा केलेला जिर्णोद्धार, धर्मशाळा, घाट, मंदिरे, विहिरी इ. समाजोपयोगी कामे आपण विसरू शकत नाहीत. अहिल्यादेवी होळकर यांनी देव, देश, धर्म यांचे रक्षण करण्यासाठी आपले आयुष्य व्यतीत केले. राजकारण, समाजकारण, धर्मपरायन या गुणाचे परमोच्च शिखरे त्यांनी कायमचे गाठले म्हणून 'पुण्यश्लोक' ही सर्वोच्च उपाधी त्यांना मिळाली.

# दहा लाखपर्यंतची कामे आता ई-निविदेशिवाय



## ठाकरे सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई : युती शासनाने तीन लाखावरील कामांना ई-निविदा काढणे बंधनकारक केले होते. मात्र आघाडी शासनाने यात शिथिलता आणत आता १० लाखावरील कामांना ई-निविदा काढावी लागणार आहे. त्यामुळे १० लाखाखालील कामे ही ई-निविदा विना करता येणार आहेत. या निर्णयामुळे नेत्यांना आपल्या कार्यकर्त्यांना खुश ठेवणे शक्य होणार असल्याचे बोलले जात आहे.**

भाजप-सेना सरकारच्या काळात तीन लाखावरील कामांना ई-निविदा काढणे बंधनकारक केले होते. ग्राम पातळीवरील भ्रष्ट्राचाराला आळा घालण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे भाजपकडुन सांगण्यात आले होते. याबाबत मे २०१५ मध्ये तीन लाखावरील कामाची ई-निविदा काढणे बंधनकारक करण्यासंदर्भात शासन निर्णय काढला होता. मात्र आता महाविकास आघाडी सरकाने ई-निविदेची मर्यादा दहा लाखपर्यंत वाढविली आहे. दहा लाखावरील कामाची आता ई-निविदा निघणार आहे. तर दहा लाखाखालील कामे ऑफलाईन निविदेने करण्यात येतील. याबाबत राज्याच्या ग्रामविकास विभागाने शासन निर्णय काढला आहे. त्यामुळे जिल्हा परीषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या दहा लाखालील कामे ई-निविदा विना करता येणे शक्य आहे.

## कार्यकर्त्यांना खुश ठेवता येणार?

**महाविकास आघाडी सरकारच्या दहा लाखावरील कामांना ई-निविदा अवलंब करण्याचा जो निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे नेत्यांना आपल्या कार्यकर्त्यांना कामे देऊन खुश करता येणार असल्याचे बोलले जात आहे. पुर्वी तीन लाखावरील कामांना ई-निविदा बंधनकारक केल्याने कोणीही बाहेरील व्यक्ती कामे घेऊ शकत होते. त्यामुळे लोकप्रतिनिधना का्यकार्यकर्त्यांना कामे देण्यास मोठी अडचण निर्माण व्हायची, बरीच कामे ही ई-निविदापासून वाचण्यासाठी तीन लाखाच्या आत दिली जायची.**

**मात्र आता ही मर्यादा दहा लाखापर्यंत गेल्याने कार्यकर्त्यांना कामे घेणे सोपे झाले आहे. राज्य शासनाने दहा लाखावरील कामांना ई-निविदेचा अवलंब करण्याच्या घेतलेल्या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. बहुतांश आमदारांचीही बऱ्याच दिवसांपासून ही मागणी होती.**

# दिंद्रुड पोलीस ठाण्यात आता महिलाराज

## एपीआय प्रभा पुंडगे यांनी पदभार स्वीकारला

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील दिंद्रुड पोलिस ठाण्यातील रिक्तपदावर सहायक पोलिस निरीक्षक प्रभा पुंडगे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली असून पुंडगे यांनी पदभार स्वीकारला आहे. कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे पुंडगे यांनी याप्रसंगी सांगितले.



दिंद्रुड पोलीस ठाण्यात प्रथमच महिला पोलीस अधिकारी म्हणून पुंडगे यांनी पदभार स्विकारला. पुंडगे या सन २०१० च्या बॅचच्या अधिकारी असून त्यांनी नांदेड, हिंगोली, लातूर आदी जिल्ह्यात ही सेवा बजावलेली आहे. फेब्रुवारी २०२१ मध्ये त्यांची माजलगाव ग्रामीण ठाण्यात नियुक्ती झाली होती, तर आता त्या दिंद्रुड पोलिस ठाण्यात रुजू झाल्या असून त्यांचा पोलीस कर्मचाऱ्यांकडून सत्कार करण्यात आला.

# वैजनाथ औटी यांचे निधन

प्रतिनिधी



माजलगाव : येथील गजानन नगर भागातील वैजनाथ विश्वनाथ औटी (वय ३० वर्षे) यांचे अल्पशा आजाराने दि.२ जून रोजी सायंकाळी औरंगाबाद येथील एका खाजगी हॉस्पिटल मध्ये उपचार दरम्यान निधन झाले.

वैजनाथ औटी यांना औरंगाबाद येथील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले होते. त्यांच्यावर तब्बल एक ते दीड महिना उपचार करण्यात आले. मात्र त्यांच्या तब्येतीने साथ न दिल्याने बुधवार दि.२ जून रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर औरंगाबाद येथेच अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, बहीण, असा परिवार आहे.

# संकेत खामकरची टीम रूग्णसेवेत तब्बल दहा दिवस भोजनव्यवस्था

प्रतिनिधी

माजलगाव : कोरोना काळात अनेक हात मदतीला धावून गेलेले आहेत. अशातच संकेत खामकर आणि त्यांच्या टीमने केलेले काम उल्लेखनीय आहे.



शहरातील शासकीय रूग्णालया सह माऊली लॉन्स, व्यंकटेश मंगल कार्यालय, कन्यादान मंगल कार्यालय याठिकाणी आदी ठिकाणी असलेल्या कोविड रूग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोफत भोजनव्यवस्था केली.



तब्बल दहा दिवसांपासून संकेत खामकर आणि त्यांची टीम अविरतपणे रूग्णसेवेत आहेत. गरजवंतांना डबे पुरविणे हे आपले परमकर्तव्य आहे, असे वर्तमानशी बोलताना संकेत खामकर म्हणाले. त्यांच्या साथीला बळ देण्याचे काम चेतन उघडे, शंकर कदम, बाळू शिरसागर, अभिजीत जाधव, सार्थक सरवदे, गोटू प्रधान, राज पाटील, अर्जून कदम, अनिकेत कदम, ओमकार पातळे, अनिकेत खामकर, रोहन जोगडे, पांडू सारपळकर आदी करत आहेत.

## खासदार डॉ.प्रितम मुंडेंचा सन्मान



बीड : जिल्ह्यात सुरू असलेल्या विकासात्मक कार्याबद्दल खासदार डॉ.प्रितम मुंडे यांचा सत्कार करताना बालासाहेब फपाळ पाटील, गोवर्धन बडे, वर्तमान माध्यम समुहाचे संपादक भगीरथ तोडकरी.

# 'छत्रपती'कडून ऊस बिलाची रक्कम बँकेत वर्ग

## उपाध्यक्ष मोहन जगताप यांची माहिती; ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळाला दिलासा

प्रतिनिधी

माजलगाव : येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या वतीने १ ते २५ एप्रिलदरम्यान ऊस गाळपास दिलेल्या शेतकऱ्यांचा ऊस बिलाचा पहिला हप्ता बँक खात्यात वर्ग करण्यात आला आहे . यात ७५४ शेतकऱ्यांच्या खात्यात ८ कोटी ५३ लाख ९ हजार ८३१ रूपये वर्ग करण्यात आले असून, शेतकऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कारखान्याचे उपाध्यक्ष मोहन जगताप यांनी केले आहे.



येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याने गाळप हंगाम २०२०-२१ मध्ये एकूण गाळप ३ लाख ६५ हजार मेट्रीक टन ऊसाचे गाळप केले आहे तसेच कारखान्याने २५ ऑक्टोंबर २०२० ते ३१ मार्च २०२१ पर्यतच्या ऊस बिलाचा पहिला हप्ता रूपये १९००/- प्रति मेट्रीक टनाप्रमाणे या अगोदर शेतकऱ्यांना अदा केलेला आहे. कारखान्याचे १ ते २५ एप्रिलदरम्यान ४४ हजार ८९९.८५८ मेट्रीक टन उसाचे गाळप झाले असून, यामध्ये एकूण ७५४ शेतकऱ्यांचा ऊस बिलाचा पहिला हप्ता १९०० रूपये प्रति मेट्रीक टनाप्रमाणे एकूण ८ कोटी ५३ लाख ९ हजार ८३१ रुपये बँकेत वर्ग केले आहेत. उर्वरित राहिलेली ऊस बिलाची. रक्कम टप्प्याटप्प्याने लवकरच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात येईल, असे जगताप यांनी सांगितले.

# संताजीनगरमधून महिलेचे मंगळसूत्र लंपास

प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील संताजीनगर भागातील माँ वैष्णवी मंगल कार्यालयाशेजारी राहत असलेल्या लक्ष्मीकांत गवारे यांच्या पत्नी दुर्गा गवारे या सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घरासमोर झाडझूड करून व सडा टाकून रांगोळी काढत असताना पाठीमागून अज्ञात व्यक्तीने येऊन मानेवर बुक्की मारली. तोच दुर्गा यांना गुंगी आल्यासारखे झाले. याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ७-८ ग्रॅमचे मणी मंगळसूत्र काढून घेऊन गेल्याची घटना घडली.

# खरीप हंगामासाठी शेतमालाचा लिलाव सुरू

## सभापती संभाजी शेजुळ; कोरोना संदर्भातील नियमांचे पालन आवश्यक

प्रतिनिधी

माजलगाव : कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे दोन महिन्यांपासून शेतीमालाचा लिलाव शासनाने बंद ठेवला होता. परंतु सध्या पेरणीचे दिवस असल्याने शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होत आहेत त्यामुळे शेतीमालाचा लिलाव सुरु केला असल्याचे सभापती संभाजी शेजुळ यांनी सांगितले. दरम्यान, खरीप हंगाम तोंडावर आला असल्याने शेतकऱ्यांना अडचण निर्माण होवू नये म्हणून हा लिलाव सुरू करण्यात आला असल्याचेही शेजुळ म्हणाले.



कोरोनामुळे दोन महिन्यांपासून लॉकडाऊन आहे. त्यामुळे शासनाने लिलाव बंद ठेवले होते. परंतु दि.३१ मेला तालुक्यात पाऊस पडला असून शेतकऱ्यांनी खरिपाची तयारी करण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांना माल विक्रीस येत असलेल्या अडचणींमुळे जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार १ जूनपासून सकाळी ७ ते दुपारी २ या वेळेत जाहीर लिलाव करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नवीन मोंढा फुलेपिंपळगाव येथे आपला शेतमाल लिलाव करण्यास आणावा असे आवाहन सभापती संभाजी शेजुळ, सचिव एच.एन.सवणे यांनी केले आहे. तर शेतकऱ्यांनी शेतीमाल लिलावासाठी आणताना मास्क, सॅनिटायजरचा नियमीत वापर करावा. सोशल डिस्टन्स पाळावे आणि शासनाने आखून दिलेल्या कोरोनाच्या नियमांचे पालन करावे असे आवाहनही शेजुळ यांनी केले आहे.

# पुन्हा किट्टीआडगावात महिलेचा शॉक लागून मृत्यू

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील किट्टीआडगाव येथील चौकात अंगणवाडी मदतनीस सुनिता मारोती अंबुरे यांचे घर आहे. शनिवारी सकाळी राहत्या घरात पीठाच्या गिरणीचा शॉक लागून सुनिता अंबुरे (वय ४६) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.



किट्टीआडगाव येथे पंधरा दिवसांत विजेचा शॉक लागून मृत्यू होण्याची ही दुसरी घटना आहे. सुनिता अंभुरे या किट्टीआडगाव येथे एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाडीत मदतनीस म्हणून १९९४ पासून कार्यरत होत्या.

# आमदार प्रकाश सोळंकेंच्या पाठपुराव्यामुळे कोविड रूग्णांना दिलासा

## ग्रामीण भागातील खाजगी रूग्णालयातील दर आले निम्म्यावर

प्रतिनिधी

माजलगाव : ग्रामीण भागातील खाजगी रूग्णालयांनी शासनाने दिलेले कोविड रूग्णांसाठीचे दर निश्चित जनसामान्यांच्या आवाक्या बाहेर होते. मात्र माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी राज्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांच्याकडे पाठपुरावा करून सदर दर अर्ध्यावर आणले आहेत. या निर्णयामुळे सामान्य जनतेला दिलासा मिळाला आहे.





शासनाने ग्रामीण भागातील खाजगी रूग्णालयांना जे दर निश्चित केले होते ते सामान्य जनतेला परवडणारे नव्हते. या बाबत आमदार प्रकाश सोळंके यांनी दि. ३० मे रोजी राज्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांना मुंबईत जावून निवेदन दिले होते. त्यावर मंत्री राजेश टोपे यांनी सहानुभूतीपूर्वक विचार करून सदरील दर अर्धे कमी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. आमदार प्रकाश सोळंके यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सामान्य रूग्णांना मात्र मोठा दिलासा मिळाला आहे. आमदार सोळंके यांनी नेहमीच सामान्य लोकांची बाजू विधानसभेत मांडली आहे. खाजगी रूग्णालये मनमानी करत अव्वा की सव्वा बिले आकारत असताना मंत्री राजेश टोपे यांच्या एका निर्णयामुळे या प्रकाराला चाप बसला. त्यामुळे राज्यातील जनसामान्य रूग्ण आरोग्यमंत्री राजेश टोपे आणि माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांना धन्यवाद देत आहेत.

### राज्यातील ग्रामीण रूग्णांवरील अन्याय दूर झाला : आमदार प्रकाश सोळंके

वर्तमानशी बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले, ग्रामीण भागातील कोविड रूग्णांना अगोदरचे दर परवडणारे नव्हते त्यामुळे सरकारच्या नजरेत ही तफावत आणून दिली. झालेल्या निर्णयामुळे मुंबई, पुणे या मेट्रो सिटींसाठी वेगळे दर तर जिल्हा पातळीवरच्या रूग्णालयांसाठी वेगळे दर तर ग्रामीण भागांसाठी हे दर निम्म्यावर आणण्यात आलेले आहेत. अगोदरचे दर मेट्रो सिटींसाठी आणि ग्रामीणसाठी सारखेच होते हा अन्याय दूर करण्यात सरकार दरबारी मला यश आलेले आहे.

**अगोदरचे दर**

१) जनरल वार्ड + विलगीकरण = ४००० प्रति दिवस
२) आयसीयु (व्हेंटीलेटर शिवाय) + विलगीकरण = ७५०० प्रति दिवस
३) आयसीयु (व्हेंटीलेटर सह) + विलगीकरण = ९००० प्रति दिवस

**सुधारित दर**

१) जनरल वार्ड + विलगीकरण = २००० प्रति दिवस
२) आयसीयु (व्हेंटीलेटर शिवाय) + विलगीकरण = ३७५० प्रति दिवस
३) आयसीयु (व्हेंटीलेटर सह) + विलगीकरण = ४५०० प्रति दिवस

## माजलगाव बाजार समितीत वृक्षारोपण



माजलगाव : फुलेपिंपळगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करताना बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे समवेत लेखापाल उध्दव फपाळ, कोषपाल मिनीनाथ मुळे, गणेश कदम

# राष्ट्रीय कुटुंब योजनेचा ४७ जणांना लाभ

## सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडेंच्या हस्ते धनादेश वितरित

▶ प्रतिनिधी

परळी : येथील दारिद्र्य रेषेखालील ४७ कुटुंबांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेचा लाभ देण्यात आला असून, या ४७ जणांना प्रत्येकी २० हजार रूपये अर्थ सहाय्याचे सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले आहे.

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १८ ते ५९ वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती अथवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांस एक रकमी २० हजार रूपयांची मदत या योजनेंतर्गत करण्यात येते. दरम्यान, ४७ कुटुंबातील वारसांना प्रत्येकी २० हजार



रूपयांच्या धनादेशांचे मंत्री मुंडेंच्या हस्ते सोमवारी परळीतील चेमरी रेस्ट हाऊस येथे वितरण करण्यात आले आहे. यावेळी सर्व लाभार्थींना एक एक वृक्ष भेट देण्यात आले असून त्या वृक्षाचे संवर्धन करावे असे आवाहनही केले आहे.

या कार्यक्रमास मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह जि.प.गटनेते अजय मुंडे, न.प.गटनेते वाल्मिक कराड, दीपक देशमुख, बाजीराव धर्माधिकारी, राजाभाऊ पौळ, उपविभागीय अधिकारी नम्रता चाटे, तहसीलदार सुरेश शेजुळ, नायब तहसीलदार रूपनर, अनंत इंगळे, रविंद्र परदेशी आदी उपस्थित होते.

# धारूर-आडस रस्त्याची दैना कधी फिटणार?

## जागोजागी खड्डे; वाहनधारक त्रस्त

▶ प्रतिनिधी

धारूर : ग्रामीण भागाकडे बांधकाम विभागाने कानाडोळा केल्याने जागोजागी रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. यामुळे वाहनधारक त्रस्त झाले आहेत. धारूर ते अंबाजोगाई या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. माजलगाव, बीडकडून येणारी तसेच अंबाजोगाईला जाणारी वाहने आडसमार्गे जातात. परंतु धारूर ते आडस मार्गावर मोठे खड्डे झाल्याने वाहतुकीची मोठी अडचण येत आहे व याकडे बांधकाम विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष झाले आहे.

धारूर शहरापासून १३ किलोमीटर अंतरावरील आडसकडे जाण्यासाठी वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे. तसेच सध्या खरीप हंगाम असल्यामुळे बी-बियाणे खरेदीसाठी जाणाऱ्या, येणाऱ्या शेतकऱ्यांना या खड्ड्यांमुळे मोठी अडचण येत आहे. काही दिवसांपूर्वी बांधकाम विभागाने खड्डे भरून घेतले होते. कामाचा दर्जा चांगला





नसल्याने पुन्हा खड्डे झाल्याने वाहनधारकांना मोठी अडचण येत आहे. लवकरात लवकर खड्डे भरून नागरिकांची व वाहनधारकांची अडचण दूर करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत. किल्लेधारूर शहर व तालुक्यातून महत्त्वाची कामे तसेच दवाखाना, उपचारांसाठी अंबाजोगाईला आडस मार्गे जावे लागते. मात्र जागोजागी खड्डे पडल्याने वाहतुकीला मोठी अडचण येत असून यामुळे वाहनांमधील रूग्णाचे मोठे हाल होत आहेत.

## तालुका सरचिटणीसपदी ॲड.प्रमोद तौर यांची निवड

▶ प्रतिनिधी



माजलगाव : जिल्हा व सत्र न्यायालयात कार्यरत असलेले ॲड.प्रमोद तौर हे सामाजिक कार्यात नेहमीच सक्रीय असतात, कोरोना काळात कोरोना संक्रमित गरजू रूग्णांची व त्यांच्या नातेवाईकांची मोफत भोजनव्यवस्था करत निस्वार्थी भावनेने सामाजिक बांधिलकी जपली. यासह ॲड.तौर यांनी केलेल्या विविध सामाजिक कार्याची दखल राष्ट्रवादी पक्षाने घेत सोमवारी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजलगाव तालुकाध्यक्ष रमेश सोळंके यांच्या हस्ते ॲड.प्रमोद तौर यांना माजलगाव तालुका सरचिटणीस पदाचे नियुक्तीचे पत्रक देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक राहुल लंगडे, सभापती संभाजी शेजुळ, नाना नाटकर, ॲड.अमित नाटकर आदींची उपस्थिती होती.

## 'वर्तमान'चे कौतुक







बीड : जिल्ह्याच्या खासदार डॉ.प्रितम मुंडे, भाजपा नेते रमेश आडसकर आणि राष्ट्रवादीचे माजलगाव तालुकाध्यक्ष रमेश सोळंके यांनी वर्तमानच्या ताज्या अंकाचे वाचन करून वर्तमान टीमचे कौतुक केले.

# तब्बल अडीच महिन्यांनंतर लालपरी रस्त्यावर

▶ प्रतिनिधी

बीड : कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर राज्य परिवहन महामंडळाची बीड जिल्ह्यातील बस वाहतूक तब्बल अडीच महिने बंद होती. कोरोना रूग्णांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालल्याने राज्य शासनाच्या निर्देशानुसार सोमवारपासून एस.टी. बससेवा जिल्ह्यातील आगारातून सुरू करण्यात येत असल्याचे एस.टी. महामंडळाकडून सांगण्यात आले आहे.

**आगारनिहाय सुटणाऱ्या बस :**

**१) बीड - परळी, नांदेड, परभणी, अंबाजोगाई, लातूर, औरंगाबाद, जालना, सोलापूर, पुणे, मुंबई २) परळी - बीड, परभणी, लातूर, अंबाजोगाई, नांदेड, सोनपेठ, ३) धारूर - बीड, अंबाजोगाई, केज, तेलगाव, पुणे, ४) माजलगाव - लातूर, परळी, परभणी, नांदेड, सोलापूर, कोल्हापूर, बीड मार्ग मुंबई, गेवराई , आष्टी ५) गेवराई - माजलगाव, परभणी, नांदेड, शेवगाव, पुणे, जालना, औरंगाबाद, ६) पाटोदा - पुणे, बीड, परळी, मुंबई, ७) आष्टी - पुणे, स्वारगेट, अहमदनगर, मुंबई, बीड, ८) अंबाजोगाई - बीड, परळी , औरंगाबाद, लातूर, अहमदपूर, पुणे, धारुर, परभणी**

### '...तर बस सेवेचा विस्तार करू'

या सेवेस मिळणारा प्रवाशांचा प्रतिसाद लक्षात घेऊन अन्य मार्गावर विस्तारित बससेवा सुरु करण्याचे. नियोजन करण्यात येणार आहे. सर्व प्रवाशांनी एस.टी.बसमध्ये प्रवास करताना मास्क, सॅनिटायझर वापरावे. शासकीय आरोग्य विषयक सूचनांचे पालन करावे व राज्य परिवहन महामंडळाच्या बसनेच प्रवास करावा, असे प्रवाशांना आवाहन एसटी प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



### ग्रामीण प्रवाशांना एसटीची प्रतीक्षा

सोमवारपासून बीड जिल्ह्यात लालपरी अर्थात आपल्या हक्काची एस.टी. रस्त्यावर धावली याबाबत प्रवाशांमधून संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. सोमवारी सुरू झालेली एस.टी.सेवा काही शहरांपुरतीच मर्यादीत असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांमध्ये नाराजी दिसून येत आहे. दरम्यान, ग्रामीण भागातही एस.टी.सेवा लवकर सुरू करण्यात यावी अशी मागणी होत आहे. ग्रामीण भागातील लोकांना दळणवळणासाठी एस.टी. हेच हक्काचे वाहन आहे. त्यामुळे ग्रामीण भागात प्राधान्याने एस.टी.सेवा सुरू करण्यात यावी असे प्रवाशांनी सांगितले.

# 'ते' चार दिवस महिलांनी तणावमुक्त रहावे : डॉ.अरुंधती कुलकर्णी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : मासिक पाळी येण्यापूर्वी शरीर रचनेत होणारे बदल, संप्रेरकाच्या कमी-जास्त होण्यामुळे होणारी मानसिक घालमेल या गोष्टी सहजतेने घेऊन मोकळेपणाने तणावमुक्त राहणे गरजेचे आहे. या काळातील शारीरिक स्वच्छता अत्यंत महत्त्वाची आहे. या काळात संपूर्णपणे आहार व आराम याबाबत जागरूक राहणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ.अरूंधती सुजित कुलकर्णी यांनी केले.

महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालयाच्या आभासी व्यासपीठावर डॉ.कुलकर्णी यांनी




आपले मत व्यक्त केले. ऑनलाईन झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक प्रभाकर साळेगावकर होते. प्रारंभी सातवीची विद्यार्थिनी अश्विनी घडसे हिने मासिक पाळी मैत्रीण...हे गीत सादर केले. २८ मे ते ५ जून या काळात मासिक पाळी समुपदेशन व स्वच्छता आठवडा साजरा होत आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थिनींचा एक व्हॉट्सॲप समूह तयार करून शिक्षिका अर्चना भाले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. मनोगतामध्ये माता पालक, विद्यार्थिनी तसेच शिक्षिकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे डॉ.अरूंधती कुलकर्णी यांनी दिली. आरोग्य, काळजी, होणारा त्रास यावर मनमोकळेपणाने मुली व्यक्त झाल्याने कार्यक्रम संयोजनाचा उद्देश सफल झाला. ऋतुजा शिंदे या विद्यार्थिनीने आभार मानले.

# अझिम प्रेमजी विद्यापीठ एक दीपस्तंभ

महाराष्ट्रातील बीड जिल्हा जो कि उसतोड कामगारांचा, कष्टकऱ्यांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. स्वस्तात मजूर मिळण्याचे ठिकाण म्हणून त्याच्याकडे पहिले जाते. कधी स्त्रिभ्रुण हत्या, बालविवाह, मारामाऱ्या, दुष्काळ, संकट अशा एक न अनेक कु-प्रसिद्धीने ओळखला जातो. तिथून बाहेर पडून स्वतःचे भविष्य घडवणे म्हणजे काळ्या दगडावरची पांढरी रेष खोडण्यापेक्षाही जास्त कठीण आहे. तो संघर्ष, ती कहाणी या एका वाक्यात शब्दबद्ध करणे कठीण आहे. पण जिद्द, मेहनत आणि चिकाटी असेल तर आल्या संकटांना दोन हात करणे शक्य होते आणि अशक्य गोष्टीही शक्य होत जातात.

मी आज स्वतःचेच उदाहरण देऊ इच्छिते.

शालेय जीवनात नेहमीच आघाडीवर असतानाही पुढील शिक्षणासाठी हाडांचं काड कराव लागलं. मराठी माध्यमातून येऊन इंग्रजी माध्यमात स्वतःला सामाऊन घेणे. खेड्यातून येऊन शहरात स्वतःची ओळख निर्माण करणे या सर्व प्रवासात कधी स्वतःशी तर कधी आपल्याच लोकांशी संघर्ष करावा लागला.

कित्येक वेळा सगळंच सोडून द्यावं, गप्प घरच्यांचं ऐकून लग्न करून टाकावं असंही वाटायचं. पण एवढ्यातेवढ्यात हार मानेल ती दिपाली नाही. लहानपणापासूनचं आगाऊपणा



करण्याची सवय. प्रसंगी सगळ्यांशी लढले पण कधी थांबले नाही आणि थांबणार नाही. आयुष्य एकदाच मिळत त्यात पण श्वासागणिक लोक की म्हणतील याचा विचार करत जगणं म्हणजे

**युवासंवाद**

**दीपाली चांदबोधले**

**राजस्थान**

मला तरी रोज slow poison घेतल्यासारखं वाटत. म्हणून शिकत राहिले, नवनवीन संधी शोधत राहिले. लहानपणी शिकत असताना नेमक कशासाठी शिकायचं हे माहित नव्हतं. पण अभ्यासाची खूप आवड होती म्हणून अभ्यास करायचे, चांगले मार्क्स पण मिळायचे. पण पुढे-पुढे जात असताना असं लक्षात यायला लागलं कि नोकरी मिळवणे, खूप पैसा कमावणे हा माझ्या शिक्षणाचा उद्देश नाही. काहीतरी वेगळे करायचे आहे. माझ्या शिक्षणाचा, माझ्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी झाला पाहिजे असे वाटायचे. मग स्पर्धा परीक्षा मधून पद (नोकरी नाही) मिळवण्याचे ठरवले. एक-दीड वर्षे अभ्यासही केला. पण खर सांगायचे तर ते करत असतांना खूप मेहनत करूनही भीती मानसिक ताणतणाव होता. कारण ज्या भागातून आले जे शिक्षण घेतले ते आणि स्पर्धा यात खूप मोठी दरी होती. अशक्य नक्कीच नव्हते पण तिथे हवा तेवढा वेळ, पैसा गुंतवणे मला शक्य नव्हते. तेंव्हा दुसऱ्या संधी शोधत असताना फेलोशिप बद्दल माहिती मिळाली. पहिल्याच प्रयत्नात निवड झाली. तिथेही पावलोपावली संघर्ष करावा लागला. जिथे करत असलेले काम फक्त पैशासाठी नाही तर ज्यांच्यासाठी करताय त्यांच्या आणि माझ्या दोघांच्या चेहऱ्यावर आनंद देऊन जाईल. दिवसभर काम केल्यानंतर आपल्यामुळे कोणाचे तरी भले होत आहे याच्या समाधानाने रात्री शांत झोप लागले तेच हे काम होते. पण इथे आल्यानंतर जाणीव व्हायला लागली की, समाजकार्य करण्यासाठी आधी स्वतःला भक्कमपणे उभे करणे गरजेचे आहे. त्याशिवाय तुमच्या कामाला आणि परिणामी तुमच्या व्यक्तिमत्वाला हवी तेव्हढी मान्यता मिळत नाही. त्यातूनच दोन वर्षे गांधी फेलोशिप पूर्ण करून पुढे उच्च शिक्षण घेण्याचा विचार करत होते.

पण परत मनात असंख्य प्रश्न ?? घरचे काय म्हणतील, प्रत्येक वेळी काहीतरी अटींवर एक-दोन वर्षांची मुदत मागत मागत इथवर आले. आता काय सांगणार घरी ...मी जो विचार करून उच्च शिक्षणाचा विचार करून निर्णय घेते आहे तो ते समजून घेतील का? बरं घेतलंच तरी मोठमोठ्या institute मधून पदवी घेण्यासाठी आपण पात्र ठरणारं का? पात्र ठरले तरी पैसा कुठून आणणारं? अशा वेळी नेहमीप्रमाणे जवळच्या मित्र-मैत्रिणींनी प्रोत्साहन दिले. काहींनी तर आम्ही जॉब करतो आणि तुला शिक्षणाला पैसा देतो इथपर्यत आधार दिला आणि कसेबसे मी तयार झाले. भारतातल्या नामांकित उच्च दर्जाच्या Tata Institute of Social Science(TISS), अझीम प्रेमजी विद्यापीठ (APU), अशा top institute ला apply केले. आणि परत एकदा स्वतःला सिद्ध करत भारतातील नाही तर आशिया खंडातील सर्वात पहिले समाज कार्य शिक्षण देणारे पहिले institute म्हणजे TISS ची अत्यंत कठीण अशी First entrance Exam उत्तीर्ण झाले. TISS च्या बरोबरीने समाज कार्य शिक्षणात आपले योगदान देणाऱ्या अझीम प्रेमजी विद्यापीठात (१००%) scholarship मिळवून प्रवेशपत्र ठरले.




आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.